**नियमित दिवाणी कज्जा नं.७६/२०२० मधील** नि.क्र.२२ खालील आदेश
(पारित दिनांक-१८/०१/२०२२)

**रामचंद्र कळंत्रे विरुध्द शामराव कळंत्रे वगैरे**

**CNR - MHKO130005212020**

**०१.** प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ यांनी कैफियत वेळेत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून मिळण्याकरीता दाखल केला आहे.

**०२.** प्रतिवादीच्या कथनानुसार, कोरोना महामारीच्या प्रार्दुभावामुळे प्रतिवादी क्र. १ यांना आवश्यक ती कागदपत्रे वेळेत मिळाली नाहीत. तसेच कोरोना महामारीच्या प्रार्दुभावामुळे न्यायालयाचे कामकाज मर्यादित स्वरुपात चालत होते. प्रतिवादीची कैफियत अभिलेखावरती येणे गरजेचे आहे. तसेच न झाल्यास प्रतिवादी यांचे मोठे नुकसान होणार आहे. त्यामुळे सदरचा अर्ज दाखल करण्यात आलेला आहे.

**०३.** वादी यांनी सदर अर्जास म्हणणे दाखल करुन राज्य शासनाने दरम्यानच्या कालावधीत टाळेबंदी लावल्यामुळे प्रतिवादीना कैफियत अभिलेखावरती दाखल करण्यास उशीर झाला आहे, असे कथन केले आहे.

**०४.** उभय बाजुच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**०५.** नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करता, प्रतिवादी क्र. १ यांची कैफियत अभिलेखावरती येणे गरजेचे आहे. तसे न झाल्यास प्रतिवादी यांची बाजू अभिलेखावरती येणार नाही व त्यांना न्याय हक्कापासून वंचित राहावे लागेल. प्रतिवादीविरुध्द कैफियतीसंदर्भात कोणताही विरोधार्थी आदेश न झाल्याने प्रस्तुत प्रकरणी खर्चासंबंधी कोणताही आदेश करणे उचित राहणार नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो-

**- आ दे श -**

१) अर्ज (निशाणी क्र. २२) मंजूर करण्यात येतो.

२) प्रतिवादी क्र. १ ची कैफियत दाखल करुन घेण्यात येते.

३) खर्चासंबंधी आदेश नाही.

Amol Bharat Jawale

Digitally signed by Amol Bharat Jawale
Date: 2022.01.21 16:39:34 +0530

कागल (अमोल भारत जवळे)

दिनांकः– १८/०१/२०२२ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कागल.